M.V.P.Samaj's

**Arts, Science & Commerce College, Ozar (Mig),**


Tal-Niphad, Dist-Nashik


Department of Geography

## DHODAP FORT


# TREKKING REPORT


**16/02/2018**














Class: T.Y.B.A.

Subject: Practical Geography (S-4)

Students Name: Devkar Ankita Subhash

Examination Seat No.: 36270

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय (ओझर मिग)

## भूगोल विभाग

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की.......देवकर अंकिता सुभाष.......

वर्ग......टी.वाय.बी.ए.......परिक्षा नं.......36270.......

हीने/हयाने शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या पुर्ततेसाठी " **धोडप किल्ला** " या भौगोलिक स्थानांचा क्षेत्रीय भेट(ट्रेकिंग) वृत्तांत यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

मार्गदर्शक | परिक्षक | विभागप्रमुख

Page No.:_____
Date:__/__/__

# अनुक्रमाणिका


| | | पेजनंबर | सही |
|---|---|---|---|
| १. | मुख्यपृष्ट | १ | |
| २. | प्रमानपत्र | २ | |
| ३. | अनुक्रमाणिका | ३ | |
| ४. | प्रस्तावना | ४ | |
| ५. | ट्रेकिंग स्थान निवड | ५ | |
| ६. | ट्रेकिंग पूर्वतयारी | ६ | |
| ७. | अभ्यासक्षेत्र | ७ | |
| ८. | भौगोलिक माहिती | ८ | |
| ९. | घोडपकिल्ल्याचा इतिहास | १६ | |
| १०. | घोडप किल्ल्यावरील पाहण्याचे ठिकाने | १७ | |
| ११. | गडावर जाण्याच्या वाटा | १९ | |
| १२. | सुविधा | २० | |
| १३ | घोडपकिल्ल्याचे महत्व | २१ | |
| १४. | प्रश्नावली स्पष्टीकरण | २२ | |
| १५. | सारांश | २५ | |
| १६ | संदर्भ | २६ | |
| १७ | आभार | २७ | |

Page No.:_____
Date:__/__/__

# प्रस्तावना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ या वर्षात एस. वाय. बी.ए. व टी. वाय. बी.ए च्या भूगोल विषयात सहल अहवाल, खेडे सर्वेक्षण आणि ट्रेकिंग अहवाल हे उपक्रम अभ्यासक्रमात समाविष्ट व अनिवार्य केले आहे. या साठी मी देवकर अंकिता सुभाष टी.वाय. बी.ए. ची विद्यार्थीनी असून ट्रेकिंग अहवाल तयार केला आहे.

हा अहवाल चांदवड तालुक्यातील हद्दी गावातील धोडप या किल्ल्याचा आहे. १६ सप्टेंबर २०१८ रोजी आमच्या भूगोल विभागाची ट्रेकिंग धोडप किल्ल्यावर गेली होती. भूगोल हा प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात जावून अनुभव घेण्याचा विषय आहे. धोडप किल्ल्याचा प्रत्यक्षात अभ्यास करून हा अहवाल तयार केला आहे. धोडप किल्ल्याला दिलेल्या भेटी दरम्यान हद्दी गावाच्या ग्रामस्था कडून प्रश्नावली भरवून घेतल्या. व त्या प्रश्नावलीवरुन सविस्तर स्पष्टीकरण केले आहे. धोडप किल्ल्याच्या विविध घटकांचा अभ्यास केला उदा. भूरचना, हवामान, नैसर्गिक वनस्पती, इतीहास इ. गोष्टी अभ्यासल्या.



Cellpag

Page No.:_____
Date:__ /__ /__

# ट्रेकिंगची स्थान निवड

भूगोल या विषयात प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात जावून पर्यावरनाचा अभ्यास करणे गरजेचे असते. भूगोल हा विषय प्रत्यक्ष निसर्ग अभ्यासण्याचा विषय आहे. निसर्ग सौंदर्य बघण्या बरोबरच निसर्गातील विविध घटक अभ्यासने गरजेचे असते. विद्यार्थ्यांना भूगोल या विषया मार्फत निसर्ग अभ्यासता यावा, पुस्तका व्यतिरिक्त नवीन काही शिकण्यास मिळावे, प्रत्यक्षात भूगोल विषय समजावा यासाठी शिक्षण संस्थेने ट्रेकिंग हा विषय अभ्यास क्रमात समाविष्ट केला आहे.

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) या कॉलेज मधील भूगोल विभागाचे प्राध्यापक श्री ठाकरे सर, गायकवाड सर, गांगुर्डे सर यांनी ट्रेकिंग साठी धोडप किल्ला निवडला. धोडप हा किल्ला महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा किल्ला आहे. या प्रचंड उंच किल्ल्याचे सौंदर्य, तेथील हवामान व तेथील लोकजीवन, नैसर्गिक घटक अभ्यासण्यासाठी या धोडप किल्ल्याची ट्रेकिंग साठी निवड केली.


Cancelled
ARTS SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

# * ट्रेकिंगची पुर्वतयारी *

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाने B.A भूगोल विषयात ट्रेकिंग हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे. कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ओझर(मिग) या महाविद्यालयातील भूगोल विषयाची दरवर्षी ट्रेकिंग किल्ल्यावर जाते या वर्षी देखील (2017-18) भूगोल विभागाची ट्रेकिंग चांदवड तालुक्यातील धोडप किल्ल्यावर गेली होती. धोडप किल्ल्यावर जाण्यासाठी एक महिना आधी T.Y.B.A च्या विद्यार्थ्यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून 250 रु जमाकरुन घेतले. विद्यार्थ्यांनी महामंडळाची बस बुक केली. भूगोल विभागाचे प्राध्यापक ठाकरे सर, गायकवाड सर, गांगुर्डे सर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. ट्रेकिंगसाठी एकून 45 विद्यार्थी गेलो होतो. त्यामध्ये T.Y.S.Y.B.A चेविद्यार्थी F.Y.Bsc चे विद्यार्थी तीन शिक्षक व एक कर्मचारी इ. सर्व धोडप किल्ल्याच्या ट्रेकिंगसाठी 16 - सप्टेंबर 2017 या दिवशी आम्ही सर्व महामंडळाच्या बसने सकाळ 8.00 वाजता पिंपळगाव मार्गी धोडप किल्याला रवाना झालो.



Cellpage




घोडप किल्ल्याचा नकाशा

Page No.:____
Date:__ /__ /__

# अभ्यासक्षेत्र

अफाट अशा विश्वात असणारा पृथ्वीचा जीवसृष्टी असणाऱ्या ग्रहावरील आशिया या खंडाच्या दक्षिणेस असणारा भारत या देशातील २९ राज्यामधील क्षेत्रफळाच्या दृष्टीने तीसऱ्या क्रमांकाचे व भारताच्या पश्चिमेस असलेले महाराष्ट्र राज्य, या राज्यातील नाशीक जिल्ह्यामधील चांदवड या तालुक्यातील हद्दी या महानगरीया गावात धोडप किल्ला आपले आस्तित्व टिकून उभा आहे.

धोडप किल्ल्याचे जगाच्या पाठीवरील रेखावृत्तीय व अक्षवृत्तीय अंतर

| अक्षवृत्तीय अंतर | रेखावृत्तीय अंतर |
|---|---|
| 20°.38'.58" N | 74°.02'.96" E |
| 20°.22'.58" N | 74°.01'.43" E |

चांदवड तालुक्यात पंधरा किल्ले आहे त्या पैकी धोडप किल्ला हा मुख्य आहे. नाशीक जिल्ह्याच्या मध्यभागातून जाणारी सह्याद्रीची पूर्व पश्चिम डोंगर रांग म्हणजे अजंठा-सातमाळ हि होय. त्यात धोडप किल्ला उंची नुसार दुसऱ्या क्रमकांचा बलदंड किल्ला आहे. धोडप चि उंची १४५१ मी व ४७५१ फूट इतकी आहे. धोडप किल्ला गिरिदुर्ग प्रकारात मोडतो. धोडप किल्ल्याची स्थापना १०५६ मध्ये झालेली आहे. धोडप किल्ल्याची सध्याची स्थिती जीर्ण स्वरूपाची आहे.



Cellpage

# GPS Hight

| स्थान | अक्षवृत्तीय अंतर | रेखावृत्तीय अंतर | उंची (मिटर) |
| --- | --- | --- | --- |
| Hatti village | 20°. 21'. 924" N | 74° 2' 124" E | 795 m |
| Dhodap fort starting | 20°. 22 123" N | 74° 2 205" E | 812 m |
| 3) | 20° 22' 486" N | 74° 02' 150" E | 820 m |
| 4) | 20° 22' 693" N | 74° 02 133" E | 853 m |
| 5) | 20° 22' 832" N | 74° 02 017 E | 938 m |
| 6) | 20° 23 037 N | 74 02 194 E | 1027 m |
| 7) | 20 23 034 N | 74 02 214 E | 1040 m |
| 8) | 20 12 06 N | 74 01 956 E | 1174 m |
| 9) | 20 22 958 N | 74 01 609 E | 1307 m |
| Dhodap last Point | 20° 23 022 N | 74 01' 726 E | 1321 m |

Canceled

Science & Commerce College
OZAR (MIG)
275219

## भौगोलिक स्थान

नासिक जिल्ह्यातील व चांदवड तालुक्यात धोडप हा किल्ला आहे. नासिक जिल्ह्यातील जागारी सह्याद्रीची पूर्वपश्चिम डोंगर रांग म्हणजे अजंठा सातमाळ ही होय. अजंठा सातमाळ रांग म्हणजे अजंठागिरीदुर्गाची साखळी आहे. या साखळी मधील सर्वात उंच आणि बलदंड किल्ला म्हणजे धोडप हा होय. शिवलिंगासारख्या आकाराचा माथा असलेला धोडप या आकारामुळे दूरवरून स्पष्ट पणे ओळखून येतो.

### धोडप किल्ल्याची भूरचना :-

सातमाळ रांगेची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे जमिनितून बाहेर आलेल्या लाव्हारसामुळे झालेली आहे. धोडप किल्ल्याची निर्मिती लाव्हारसाच्या उद्रेका मुळे झाली आहे धोडप किल्ल्याचा शिखराकडिल भाग प्रचंड मोठ्या भिंतीसारखा आहे. हा भाग तीव्र उताराचा असून प्रचंड मोठ्या प्रमानावर उंच व रुंद आहे. धोडप किल्लावर अ दगडाच्या गुहा आहे त्या निसर्ग निर्मित आहे. धोडप किल्ला हा बेसॉल्ट खडका पासून बनलेला आहे. धोडप किल्ल्या वर काही ठिकानी पठाराचा भाग आहे तर काही ठिकानी शिखरा कडिल भाग असंद अथवा प्रकारचा आहे कि तेथे आपन पोहचू शकत नाही. धोडप हा किल्ला चढण्या साठी अत्यंत कठिन आहे. धोडप किल्यावर असलेल्या तलाव हे निसर्ग निर्मित असून तेथील पाणि पिण्या

ARTS SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

योग्य आहे. धोडप किल्ल्यावर सर्व प्रकारचे भूउतार बघायला मिळतात उदा. अरुंद शिखर, पठाराचा सपाट भाग, तीव्र उतार, मंद उतार, अंतरवक्र उतार, बाहिवक्र उतार सर्वात महत्वाचा भाग म्हणजे धोडप किल्ल्यावरील खिंड अशी खिंड सहसा कोठे पहायला मिळत नाहि. ती फक्त धोडप किल्ल्यावरच पहायला मिळाली. धोडप किल्ल्याच्या संपूर्ण आकाराचा विचार केला तर तो त्रिकोणी आकाराचा आहे. धोडप किल्ल्यावर असलेली पाण्याची टाकी बारमाही आहे. अशा प्रकारचा धोडप किल्ल्यावरील ५०० फूट सरळ भिंत व मोठी वैशिष्टयपूर्ण नैसर्गिक खाच यामुळे अशा वैशिष्टयपूर्ण रचनेमुळे भूपृष्टामुळे धोडप किल्ला आपले लक्ष सहज वेधून घेतो.

Cancelled

धोडप किल्ल्याचे हवामान :-

धोडप हा किल्ला महाराष्ट्र राज्याच्या वायव्य भागात आहे. धोडप किल्ल्याचा विस्तार २०° उत्तर ते ७५° पूर्व असल्यामुळे धोडप हा किल्ला उष्ण कटिबंधात येतो. त्याच प्रमाने धोडप किल्ल्याचे हवामान हे ऋतू नूसार बदलते. उन्हाळयात प्रचंड उन्हाळाते अर्थात तापमान वाढते. तर पावसाळयात चांगल्या प्रमानात पर्जन्य होते. धोडप हा किल्ला १४५१ मी. उंच असल्यामुळे पर्जन्याच्या दृष्टीने अनूकुल ढग आकार आहेत. धोडप किल्ल्यावर नैऋत्य मोसमी वारे व परतीचे ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे पाऊस / पर्जन्य मिळते पावसाळयात संपूर्ण धोडप किल्ला हिरवा शालू नेसल्या सारखा दिसतो.

SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG)

घोडप हा किल्ला महाराष्ट्र राज्यात आहे. व महाराष्ट्र हे राज्य दख्खनच्या पठारावर आहे. दख्खनच्या पठाराला अवर्षणग्रस्त प्रदेश असे म्हणतात. या दुष्काळी प्रदेशात पर्जन्यमान केवळ २५ सें.मी ते ५० सें.मी. पर्यंतच असते. हिवाळ्यात तापमान कमी असते. डिसेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात कमी तापमान, निरभ्र आकाश, कमी आर्द्रता असते.

## नैसर्गिक वनस्पती :-

वनस्पती ही एक मौल्यवान नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. कोणत्याही प्रदेशातील नैसर्गिक वनस्पती या त्या प्रदेशाचे तापमान, पर्जन्यमान मृदा व मानव या घटकावर अवलंबून असते. वनस्पतीमुळे भूप्रदेशाचे सौंदर्य वाढते. वनस्पतींच्या प्रकारावर व वाढीवर सर्वात जास्त प्रभाव हवामानाचा पडतो. भारतामध्ये हवामानात विविधता असल्यामुळे वनस्पती प्रकारातही खूप विविधता आढळून येते. वनस्पतीच्या वाढीसाठी उष्ण व दमट आर्द्र हवामान पोषक असते. घोडप किल्ल्यावर पावसाळा व हिवाळा या दोन ऋतूत नैसर्गिक वनस्पती मोठ्या प्रमाणावर वाढतात. घोडप किल्ल्यावरील वनस्पती उष्ण कटिबंधीय आर्द्र व शुष्क पानझडी वृक्षांमध्ये येतात. त्या मुळे त्यांना मान्सूनची जंगले वने असे म्हणतात. कोरडा ऋतू दीर्घकालाचा असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होते. पावसाळ्यात उपलब्ध होणारा पाण्याचा पुरवठा वर्षभर पुरेसा होत नाही. त्यामुळे कोरड्या ऋतूत घोडप किल्ल्यावरील वनस्पती मार्च ते मे

SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

Page No.:_____
Date:__/__/__

या काळात ६ ते ८ आठवडे वनस्पतींचे बाष्पोत्सर्जन कमी व्हावे व वृक्षांच्या बुंध्यांत पाणी टिकून राहावे म्हणून या कालावधीत वनस्पती आपली पाने गाळतात. नंतर पावसाळ्यात या वृक्षांना पाने फुटू लागतात. पाने फुटतात, पालवी फुटते व वृक्ष हिरवेगार दिसू लागतात. घोडप किल्ल्यावर काटेरी झाडे, पिंपळ, केळी, करवंद, मोठ्या प्रमाणावर हारळ इ. नैसर्गिक साधन संपत्ती आहे. मोठ-मोठ्या कडा वृक्षाच्या मुळामुळे अडकलेल्या आहे. घोडप किल्ल्यावर निळ्या व गुलाबी रंगाच्या फुलांची झाडे मोठ्या प्रमाणावर आहे. हे फुले घोडप किल्ल्याच्या सौंदर्या मध्ये भर घालतात.

Cancelled

## घोडप किल्ल्यावरील मृदा :-

मृदा ही महत्वाची साधन संपत्ती आहे. भारतात मृदेच्या निर्मितीवर प्रत्येक भागातील भूपृष्टरचना, हवामान, तापमान व पर्जन्यप्रमाण वनस्पतींचे प्रमान, खडकाचे मूळ खनिज गुणधर्म इत्यादींचा परिणाम झालेला आढळतो. त्यामुळे वेगवेगळ्या प्राकृतीक रचनेच्या व हवामानाच्या भागात वेगवेगळी मृदा आढळून येते. महाराष्ट्र राज्य दख्खनच्या पठारावर आहे. दख्खनचे पठार आग्निजन्य खडका पासून बनलेले आहे त्यामुळे घोडप या किल्ल्यावर आग्निजन्य खडक (बेसॉल्ट) मोठ्या प्रमानावर आहे. घोडप किल्ला उष्ण कटिबंधात येतो. त्या मुळे घोडप किल्ल्यावर काळी रेगूर मृदा आढळून येते.

SCIENCE & COMMERCE COLL... OZAR (MIG) 275219

Page No.:_____
Date:__ /__ /__

बेसॉल्ट व ग्रॅनाईट खडकाचे विदारण होऊन काळी मृदा घोडप किल्ल्यावर तयार झालेली आहे. घोडप किल्ल्यावरील मृदेत ॲल्युमिनिअम व ह्युमसचे प्रमाण जास्त आहे म्हणून त्या मृदेला काळा रंग प्राप्त झाला आहे. घोडप किल्ल्यावरील मृदेत ओलावा टिकून ठेवण्याची क्षमता जास्त आहे. घोडप किल्ल्यावरील बेसॉल्ट खडक व काळी मृदा यांचे मिश्रण हे एक उत्तम वैशिष्ट आहे. खालच्या भागात मृदा काळी आहे व उंचवट्याच्या भागात या मृदेचा रंग फिकट आहे.

## घोडप किल्ल्याची जलसुविधा

घोडप किल्ल्याला व भोजारील पायथ्या भगतचे गाव हट्टी या परिसराला पावसाळयात नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे पाणि मिळते. पावसाळयात मुबलक पाणी पुरवठा होतो. घोडप किल्ल्याच्या अतीउंच शिखराकडील भागामुळे बाष्पयुक्त ढग अडवले जातात. त्याचा फायदा पर्जन्यमान वाढवयात होतो. हट्टी गावात व घोडप किल्ल्यावर छोटे तलाव निर्माण झालेले आहे. घोडप किल्ल्यावर दोन नैसर्गिक तलाव निर्माण झालेले आहे. त्यातील एक तलाव संपूर्ण बेसॉल्ट खडकाने बनलेला आहे. तेथील पाणी बाराही महिने पिण्यायोग्य असते. या तलावातील पाणी व घोडप किल्ल्याच्या मृदेतील पाणि उताराप्रमाणे पाझरत असते.

ARTS SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219




Cellpage

# * घोडप किल्ल्याची संस्कृती *

घोडप किल्ल्याला फार पूर्वी पासून ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. घोडप किल्ल्यावर एक प्रचंड मोठी गुहा प्रचंड मोठ्या बेसॉल्ट खडकात नैसर्गिक निर्मित असून त्यात देवीचे मंदिर आहे. घोडप किल्ल्यावर दोन बुरुज आहेत बुरुजावर जाण्या-साठी पायऱ्या आहे. घोडप किल्ल्यावर पुरातन पाच दरवाजे आहेत. घोडप किल्ल्यावर शेंदूर लावलेली गणेशमूर्ती बसवलेली आहे. त्याच प्रमाणे विस्तीर्ण माची आहे तेथे सोनारवाडी ही गवळी लोकांची वस्ती आहे. याच माचीवर दोन बुजलेल्या/ बुजलेल्या विहिरी आहे तेथे हनुमान मंदिर आहे. त्याच्या अवती भोवती दूरावस्थेतील २-५ शिवलिंग व नंदी आढळून येतात. तेथे त्याच प्रमाणे शंकराचे जिर्णोध्दार मंदिर आहे. त्या समोर छोट्या घूमटीत नंदीची मूर्ती आहे. गडावर जाताना दरवाज्यात दोन शिलालेख एकाखाली एक दगडात कोरलेले आहे तो शिलालेख फारशी भाषेतील आहे. घोडप किल्ल्यात एक कपार आहे त्या कपारीला [illegible] कपार असे म्हणतात.

CE & COMMERCE COLLEGE ★ART
OZAR
(MIG)
275219



& COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

# * इतिहास *

घोडप किल्ल्याला पूर्वी पासून इतिहास लाभलेला आहे. घोडप या किल्ल्याचा उल्लेख प्रथम १६ व्या शतकात घरब या नावाने येतो तेव्हा हा घोडप किल्ला नगरच्या निजामशाहाकडे होता. निजामशाही नष्ट करण्यासाठी आलेल्या मुघलांचा सरदार अलावर्दीखानाने निजामच्या किल्ले दाराला १ लाख रुपयाच्या मनसबीची लालूच दाखवून १९ जून १६२६ मध्ये किल्ला ताब्यात घेतला इ. सन १६७०-७१ मध्ये शिवाजी महाराजांच्या सैन्याने घोडप किल्ल्याला वेढा घातला पण त्यांना किल्ला घेता आला नाही.

नानासाहेब पेशवे व हैद्राबाद चा निजाम शहा यांच्यात झालेल्या भालकीच्या तहाप्रमाने घोडप किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. त्या नंतर त्याचा वापर मुख्यत: तुरुंग म्हणून झाला. इ. सन १६७८ मध्ये माधवराव पेशव्या विरुध्द बंड केलेल्या राघोबांनी (रघुनाथराव पेशवे) घोडप किल्ल्याच्या पायथ्याशी आश्रय घेतल्याचे कळल्यावर माधवराव पेशव्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यावेळी राघोबांच्या सैन्याने किल्ल्यावर पळ काढला व मोठी लुट माधवराव पेशव्यांनी मिळवली इ. सन १८१८ मध्ये घोडप किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

Cancelled
SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

Page No.:_____
Date:__ /__ /__

## ✳ गडावरील पहाण्याची ठिकाणे ✳

हदर्दी गावातून चांगली पायवाट गडावर जाते या वाटेने साधारणपणे १५ मी. चालल्यानंतर थोडी सपाटी लागते तेथून पुढे सुमारे एक ते दीड तास चढून गेल्यावर दोन बुरुज आणि त्याला लागून असलेली तटबंदी आपल्याला नजरेस पडते. या बुरुजावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत वरच्या बाजूस गोलाकार बांधकामामध्ये छोट्या-छोट्या खिडक्या आहेत बुरुज व तटबंदीच्या डाव्याबाजूस उत्तराभिमुख दरवाजा आहेत परंतु झाडाझुडपांच्या अतिक्रमनामुळे हा दरवाजा पायऱ्या थोड्या वर चढून गेल्यावरच दिसतो दरवाजाच्या डाव्याबाजूस तटबंदीत शेंदूर लावलेली छोटी गनेशा मूर्ती बसवलेली आहे. या बुरजामधून जाणारा पायऱ्याच्या थोडे आधी उजवीकडे वर चढून जाणारी वाट ही रखारा सुळक्याकडे जाते या वाटेने सुळक्याच्या पायथ्याशी असलेल्या आश्रमापर्यंत जाण्यासाठी २ तास लागतात. हिच वाट पुढे कांचना किल्ल्याकडे जाते. प्रवेशद्वारातून पुढेगेल्यावर आपन किल्ल्याच्या माचीवर पोहोचतो. किल्ल्याची माची पूर्व-पश्चिम पसरलेली असून सोनार वाडी ही गवळी लोकांची वस्ती याच माचीवर आहे. बाजूला एक छोटे हनुमान मंदीर आहे. दोन-चार शिवलिंग आहे. सोनारवाडी पासून दोन वाटा आहे. त्यातील उजव्या बाजूची वाट आपल्याला गडावर घेवून जाते. माचीवर शंकराचे जिर्णोध्दार मंदीर आहे. त्या समोर छोट्या घुमटीत नंदीची मूर्ती पहायला मिळते. तेथे गणपतीचे मंदीर आहे. शिवलिंगाच्या आकाराची विहीर आहे. उतरण्यासाठी त्यात पायऱ्या आहेत. किल्ल्यावर चढल्या नंतर वाटेत १५-२० पायऱ्या आहेत. दोन शिलालेख

COMMERCE COLLEGE OZAR (MIG)

ते शिलालेख टाका-खाली टाक आहे. हे शिलालेख फारशी भाषेतील आहे. सर्वात शेवटी आपन सुळक्या खालच्या गुहेत पोहोचतो. यातील टाका गुहेत पिण्या योग्य पाणि आहे. दुसऱ्या गुहेत टाक मंदिर आहे. ही जागा मुक्कामाच्या दृष्टीने योग्य आहे. गुहेच्या पुढे सरळ गेल्यावर निमुळती होत जाणारी कातळ-भिंत आहे. हा माचीसारखा भाग मोकळा असून उंचावर असल्यामुळे येथून वाडाच्या परिसर तसेच धोडपचा वरचा सुळका उत्तम प्रकारचा दिसतो. येथून चांदवड, इंद्राई, साडेतीन रोडगा, राजदेहेर, कांचन मंचन, विखारा, कन्हेरा, खळयाजवळया, सप्तश्रृंगी, अहीवंताळ, अचला अशी सातमाळ रांग पहायला मिळते. दक्षिणेकडील विस्तृत प्रदेश न्याहाळता येतो. तसेच उत्तरेकडील साल्हेर सालोटा तसेच चौल्हेरचेही दर्शन होते. २५ किल्ले तरी धोडप वरुन दिसतात. वरील सुळक्याच्या मागील बाजूस टाक मोठी मानवनिर्मित गुहा व पाण्याची टाकी आहेत सुळक्याला फेरी मारता येते.

SCIENCE & COMMERCE COLLEGE
OZAR (MIG)



Cellpage

# गडावर जाण्याच्या वाटा

धोडप किल्ल्याच्या पायथ्याला धोडांबे नावाचे गाव आहे. हे किल्ल्याच्या दक्षिण पायथ्याला असून ते नासिकला गाडीमार्गाने जोडलेले आहे. नासिककडून धुळयाकडे आग्रा महामार्ग क्र ३ जातो. या राष्ट्रीय महामार्गावर चांदवडच्या अलिकडे वडाळीभोईचा थांबा आहे. या वडाळीभोई मधून धोडांबेकडे जाण्यासाठी गाडीरस्ता आहे. धोडांबे हे नाशिकच्या उत्तरेकडे असलेल्या वणीच्या गावाशीही गाडीरस्त्याने जोडले गेले आहे. धोडपला येण्यासाठी कळवणहून ओतूर गाव गाठल्यास उत्तरेकडील डोंगरदांडाने धोडपवर चढाई करता येते. डोंगराच्या पठारावर धोडपचा माथा उंचावलेला आहे. या विस्तृत पठारावर असलेल्या झाडीझुडपामध्ये लपलेल्या अनेक वास्तू आपल्याला पहायला मिळतात. यामध्ये अनेक जोती, मंदिर, पुष्करणी, मुर्ती कबरी आढळतात.

Cancelled

COMMERCE COLLEGE OZAR (MIG)

# * सुविधा *

1) जवळचे स्थानक
ओतूर, कळवण, धोडांबे

२) राहण्याची सोय
किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहेत यात सुमारे २०लोकांची राहण्याची सोय होवूशकते. तसेच फॉरेस्ट खोंड सुद्दा आहे.

3) जेवणाची सोय
हट्टी गावात जेवणाची सोय होवू शकते.

4) पिण्याचे पाणी
किल्ल्यावर बारमाही पिण्याचे पाण्याची टाकी आहेत.

5) जाण्यासाठी उत्तम कालावधी
जून ते मार्च

6) पायथ्या पासूनचे अंतर
हट्टी गावापासून सुमारे तीन तास

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

Page No.:_____
Date:__/__/__

# * घोडप किल्ल्याचे महत्त्व *

भौगोलिक :- घोडप हा किल्ला चांदवड तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाचा बलदंड किल्ला आहे. या किल्ल्याची उंची १६ हजारी असल्यामुळे तसेच या किल्ल्याचा उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम विस्तार या मुळे बाष्पयुक्त वारे अडवले जातात त्यामुळे घोडपचे पर्जन्यमान वाढण्यास मदत होते. तसेच आसपास च्या परिसरांचे देखिल पर्जन्य वाढले. घोडप किल्ल्याच्या सर्वात टोकाकडचा विस्तीर्ण खडकाचा सुळका इतर कोणत्यात किल्ल्यावर आहे. घोडप किल्ल्याचा भौगोलिक विस्तार इतर किल्ल्या पेक्षा वेगळा आहे. तसेच सुळक्याच्या खालील गुहेत बारमाही गोड्या पाण्याची टाकी आहेत. या मुळे घोडप हा किल्ला इतर किल्ल्या पेक्षा वेगळा ठरतो.

आर्थिक :- घोडप किल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक चांदवड तालुक्यात आकर्षित होतात. त्या मुळे स्थानिक लोकांच्या उत्पादनात वाढ होते. घोडप किल्ल्या मुळे चांदवड तालुक्यातील हट्टी या लहानश्या खेड्याचा विकास होत आहे. तसेच हट्टी हे गाव पर्यटन केंद्र घोडप किल्ल्यामुळेच झाले आहे. घोडप किल्ल्यावर पावसाळ्यात मोठ्या प्रमानात वनसाधनसंपत्ती निर्माण होते. त्यामध्ये औषधी वनस्पती, फळे, रंगीबेरंगी फुले, जनावरांसाठी चारा उपलब्ध होतो. तसेच शासन घोडप किल्ल्यामुळे किल्ल्याच्या आसपास गावामध्ये विविध विकासाच्या योजना राबवत आहे.

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

# सारांश

कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) या महाविद्यालयातील भूगोल विभागाची ट्रेकिंग दरवर्षी प्रमाणे या वर्षी २०१७-१८ देखील गेली होती १६ सप्टेंबर २०१७ या दिवशी आमची ट्रेकिंग घोडप किल्ल्यावर गेली होती. या घोडप किल्ल्याच्या प्रत्यक्ष भेटीतून हा अहवाल तयार केला आहे. या अहवालात अभ्यासक्षेत्र, घोडप किल्ल्याचा इतिहास व घोडप किल्ल्याची भौगोलिक माहिती, गडावरील ठिकाणे, घोडप किल्ल्याला दिलेल्या भेटी दरम्यान हट्टी गावातील ग्रामस्थाकडून प्रश्नावली आम्ही विद्यार्थ्यांनी भरवून घेतल्या त्या प्रश्नावलींचे स्पष्टीकरण या अहवालात केले आहे.



Cellpag

Page No.:_____
Date:__/__/__

# * संदर्भ *

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविदयालय ओझर (मिग) या महाविदयालयातील भूगोल विभागाची १६ सप्टेंबर २०१७ या दिवशी ट्रेकिंग गेली होती. घोडप किल्ल्याच्या प्रत्यक्ष भेटीतून हा अहवाल तयार केला आहे. तसेच भूगोल विभागाचे मार्गदर्शक श्री ठाकरे सर, गायकवाड सर, गांगुर्डे सर यांचे मार्गदर्शन घेतले. त्याच प्रमाने हट्टी गावातील ग्रामस्थाकडून घोडप किल्ल्याच्या ट्रेकिंग अंतर्गत प्रश्नावलीचे स्पष्टीकरण केले आहे तसेच हा अहवाल तयार करण्यासाठी इंटरनेटचा वापर केला.



Cellpa

# आभार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ट्रेकिंग हा विषय अभ्यास क्रमात समाविष्ट केल्यामुळे विद्यापीठाचे आभार, कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य यांचे आभार, भूगोल विभागाचे श्री ठाकरे सर, गायकवाड सर, गांगुर्डे सर यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल यांचे आभार. माझ्या बरोबरच्या सर्व T.Y.S.Y. B.A च्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार हद्दी गावातील ग्रामस्थांचे आभार.!

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG)
Cancelled